# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/12/2021 (शनिवार)

---

## घरफोडी

1) पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील वार्ड नं 02 बिड बिना वारेगाव ता. कामठी येथे दिनांक 03/12/2021 चे 01.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— लक्ष्मी हिरामन घरत वय 47 वर्ष रा. वार्ड नं 02 बिड बिना वारेगाव ता. कामठी व मुलगा हे घरात कुलुप लावुन कामानिमीत्य बाहेर गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने घराचे दाराचा कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने रूममध्ये ठेवलले लोखंडी कपाटाचे लॉक तोडुन आतमध्ये ठेवलेली चाबीने तिजोरीचा लॉक उघडुन त्यामध्ये असलेले लहान तिजोरीचे लॉक उघडुन त्यामध्ये ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने असा एकुण 33,600/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दिपक रेवतकर मो.क्र. 9545523736 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील वार्ड क्र. 2 ओमनगर चनकापुर येथे फिर्यादी नामे— अतिक परवेज पठाण वय 38 वर्ष, रा. वार्ड नं 2 ओमनगर चनकापुर हे के बी ट्रान्सपोर्टचे पार्टनरशिपमध्ये व्यवसाय करीत असुन त्यांच्याकडे 14 ट्रक आहेत. दिनांक 01/12/2021 चे 19.00 वा. ते दिनांक 02/12/2021 चे 08.00 वा. दरम्यान फिर्यादी यांनी घराजवळील खुल्या जागेवर उभे करून ठेवलेले 14 ट्रक पैकी 05 ट्रकाचे एकुण 10 बॅटऱ्या किंमती 50,000/—रू. अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुर्यभान जळते मो.क्र. 96738 37007 हे करीत आहे.

3) पो.स्टे. काटोल :— अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील बॅक ऑफ इंडीया ऑरेन्ज प्लाजा काटोल येथे दिनांक 03/12/2021 चे 10:45 वा. ते 11.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ ममता दिनेश ढोणे वय 26 वर्ष रा मेंढेपठार ता काटोल ही बॅक ऑफ इंडीया ऑरेन्ज प्लाजा काटोल येथे गेली होती. फिर्यादी हीने बचत खात्यातुन 87,000/—रू. काढले व गाडीमध्ये पैश्याची पर्स ठेवुन औषध घेणेकरीता दुकानात गेली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे पर्स मधील 87,000/— रोख, रेडमी कंपनीचा मोबाईल फोन कि. 7,000/—रू. व जवळचे 3,000/—रू असा एकणु 97,000/—रू. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री आगासे मो.क्र. 8446283925 हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावरील मौजा एच.डी.एफ.सी बॅक समोर रामटेक येथे दिनांक 03/12/2021 चे 18.45 वा ते 19.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रवी जमनादास कठौते, वय 34 वर्षे, रा. कांद्री माईन रेल्वे क्रॉसिंग जवळ ता. रामटेक हे वारंवार मुरूम मिटी वाहतुक संबंधाने तहसिल कार्यालयात तक्रार करीत असल्याचे कारणावरून आरोपी नामे– जुनैद खान उर्फ दादाभाई रा. मनसर व इतर 7 आरोपी यांनी गैरकायदयाची मंडळी जमा करून फिर्यादी यांना अश्लिील शिवीगाळ केली की, 'तु जब से मेंबर बना है तब से मुरूम की बहुत कम्पलेन्ट कर रहा है, तेरी मस्ती उतारणी होगी' असे म्हणुन जवळील लोखंडी रॉड व लाकडी काठीने डाव्या चहऱ्याचे बाजुस, डाव्या हाताच्या अंगठयाला, छातिला, पाठीला, व डाव्या पायाला मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 147, 149, 324, 504, 506, 34 भादंवी, सहकलम 3(1) आर एस, 3 (2) व्हिए अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड श्री भिमराव टेळे मो.नं. 9923388766 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील मारोडी सव्हिर्स रोड एन एच– 53 येथे दिनांक 01/12/2021 चे 18:30 वा. दरम्यान एमएच– 40/ बीक्यु– 7923 क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक अज्ञात पुरूष वय अंदाजे 40 वर्ष याने मारोडी सव्हिर्स रोड वरून जात असता अज्ञात वाहनाच्या चालक आरोपीने आपल्या वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक हा जखमी झाल्याने त्यास उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सहायक फौजदार देशमुख मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 134, 137, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कुथे मो 9764007720 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील मोजा कोथुर्णा शिवार येथे दिनांक 03/12/2021 चे 11:00 वा. दरम्यान कोमल गणेश तराने(मृतक), वय 24 वर्ष, रा. दहेगाव जोशी ता. पारशिवनी याने आपले ताब्यातील एमएच– 40/ एडी– 0516 क्रमांकाची बजाज डिस्कव्हर मोटरसायकलवर डबलसिट निलेश कडु यास मागे बसवुन सावनेर वरून आपले गावी दहेगाव येथे होता. त्यादरम्यान खापा ते पारशिवनी रोडवर मोटरसायकल चालकाने आपले ताब्यातील वाहन स्वतः चालवित असतांना भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन रोडचे कडेला असलेल्या डिवायडर धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक कोमल तराने हा स्वताचे मरण्यास व मागे बसलेल्या ईसमास गंभीर जखमी होण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विजय मुरलीधर कापसे, वय 47 वर्ष, रा. विरगाव ता. जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अश्पाक अली चित्सीया मो नं. 8805048777 हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. काटोल :–फिर्यादी नामे– सौ. पुजा विक्की बेनपे वय 23 वर्ष रा. ह.मु. चिखली माळोदे काटोल व आरोपी नामे– 1. पति– विक्की वामनराव बेनपे हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत पिपरा रोड, सिंदी रेल्वे, ता. सेलु जि. वर्धा येथे दिनांक 04/04/2019 ते दिनांक 15/07/2021 चे 11.00 वा. ते 17.00 वा. पर्यंत आरोपी नामे– 1) व 2. सौ. शशीकला वामनराव बेनपे 3. वामन भैययाजी बेनपे 4. सौ. ज्योती सुभेलाल उंदे 5. राहुल वामनराव बेपने सर्व रा. पिपरा रोड वार्ड कं. 3 सिंदी रेल्वे काटोल यांनी संगनमत करून फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला. तसेच आरोपीतांनी फिर्यादीला जाळुन मारून टाकण्याची धमकी दिली. त्यामुळे पोलीस स्टेशन सिंधी येथे कलम 324,323,504,506,34 भादवी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्यानंतर सिंधी पोलीसांनी फिर्यादीच्या माहेरी फोन केल्यावर आपल्या बाबांना बोलावुन माहेरी आली व महिला तक्रार केन्द्र काटोल येथे तक्रार केली असता तेथे सुदधा पती हे तारखेवर हजर राहत नाही. फिर्यादीला गर्भपात करून घे व माहेरून 3 लाख रूपये घेवुन ये, असे म्हणुन टार्चर करून व शिवीगाळ करून मारहाण केले अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 417, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुनिल दौलतराव ठोंबरे मो.नं. 9011023414 हे करीत आहे.

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 12 कि. मी. मौजा वटेघाट जंगल परिसर, वटेघाट हिंगणा येथे दिनांक 03/12/2021 चे 02:00 वा. दरम्यान फिर्यादी हे स्टॉपसह प्राप्त माहितीनुसार मौजा वटेघाट येथे पेट्रोलींग करीत असता वटेघाट जंगलामध्ये त्यांना आरोपी नामे– अमरसिंग अमदसिंग बावरी वय 20 वर्ष रा. वटेघाट हा जंगलात भरमार बंदुक कि. 40,000/–रू. चा मुद्देमाल स्वतः जवळ बाळगुन फिरतांना मिळुन आला. सदर हत्यारा बाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही.

सदर प्रकरणी सरकारतर्फे श्री एल. व्हि. ठोकळ (रेंजर), तर्फे श्री मारोती त्रंबक मुंडे (वनरक्षक)वन परिक्षेत्र बुटीबोरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 3, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार किशोर डेकाटे मो. क्र. 7719889303 हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर